# बांबू वन शेती

1. पार्श्वभूमी,व महत्व.

- पारंपारिक वापर
- पर्यावरण पूरक, रोजगार निर्मितीक्षम
- आर्थिकदृष्टया उपयुक्त
- फर्निचर,कलाकुसरीच्या वस्तू
- शेती ,फळबाग,भाजीपालासाठी आधार
- पारंपारिक बांधकाम साहित्य
- कागद निर्मिती

२. बांबू वापर - नवीन क्षेत्र.

- वीज निर्मिती
- बायो-डीजेल निर्मीती
- बायो – सी.एन.जी
- बांबू टिंबर
- पर्यावरण पूरक, इमारत बांधकाम साहित्य
- अभियांत्रिकी बांधकाम साहित्य उदा.पार्टिकल बोर्ड,कोरुगेटेड शिट,

३.बांबू प्रजाती.

- गवत कुल
- जगभरात १६०० प्रजाती
- भारत १२५ प्रजाती
- महाराष्ट्र ०८ प्रजाती
- सर्वात जलदवाढ,निलगीरी पेक्षा ३पट जलद वाढ
- पोलाद पेक्षा ६ पट मजबुत

४. बांबू वन शेत,ला असणारे अडथळे.

- वनउपज
- वाहतुक परवाना
- बांबू प्रकिया उद्योगाचा अभाव
- हमीभाव
- बांबूचा पारंपारिक वापर
- अधिक उत्पादन देणाऱ्या प्रज्यातिच्या दरजेदार रोपांचा भाव
- लागवड,मशागत ,काढणी तंत्रज्ञान
- बांबू क्षेत्राच्या सर्वकष विकासासाठी शासन  धोरणाचा अभाव

## ५. महाराष्ट्रातील बांबू क्षेत्र व उत्पादन

- एकूण वन क्षेत्र ६१९३९ चौ.कि.मी
- बांबू वन वन क्षेत्र ८४०० चौ.कि.मी(१३%)
- वनक्षेत्रातील बांबू उत्पादकता १ मे.टन / हे.

६.बांबू क्षेत्राच्या सर्वकष विकासासाठी शासन धोरण

- केंद्र शासन

भारतीय वन अधिनियम १९२७ , कलम २ अंतर्गत वनेतर क्षेत्रातील बांबू वनोपज संज्ञातून बांबू वगळण्यात आला.

- राष्ट्रीय बांबू अभियान अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये बांबू क्षेत्राच्या सर्वकष विकासासाठी आर्थिक तरतूद

## बांबू क्षेत्राच्या सर्वकष विकासासाठी शासन धोरण

राज्य शासन

- दिनांक ४/१२/२०१४ अन्वये नवीन बांबू धोरण जाहीर
- (बांबू क्लस्टर ,बांबू बाजार ,प्रशिक्षण,प्रसिधी,प्रकिया उद्योग, वाहतूक परवाना रद्द करणे)
- दिनांक ०६/०८२०१६ अन्वये महाराष्ट्र बांबू विकास मंडळ स्थापना
- दिनांक ११/०४/२०१७ अन्वये राज्यातील वनेतर जमिनीवरील बांबूच्या सर्व प्रजातीना वाहतूक परवान्याचमधून सूट देण्यात आली.

- (भारतीय वन आधिनियम १९२७,कलम ४१(३)
- दिनांक १२/०४/२०१८ अन्वये नियोजन विभागाने खाजगी जमिनीवर मनरेगा अंतर्गत बांबू लागवड साठी १०० % अनुदानित योजना मंजूर केली
- बांबू प्रवतर्क कंपनीची स्थापना

## ७.बांबू लागवड

- उत्तम निचरा
- तांबडी गाळाची ,मुरूम युक्त,किंचित आम्लधर्मी
- रोपातील अंतर : ३मी x ३मी, ३मी x ४मी , ३मी x १.२मी, ४मी x ४मी, ५मी x ५मी, ६मी x ६मी
- रोपे संख्या प्रति एकर: ३३० ते १०००
- खड्याचा आकार : ६० से.मी x ६० से.मी x६० से.मी
- चराचा आकार : ६० से.मी x ६० से.मी
- खड्डे भरणे : दोन टोपल्या शेण खत ,निबोळी पेंड
- पाणी देणे : लागवडी नंतर अपुरा पाऊस असल्यास प्रती रोप १०ली. ते १५ लि. पाणी देणे.
  पाऊसाचे दिवस वगळता इतर दिवशी पाणी प्रती रोप पती दिवशी ८ ली. ते १० लि. पाणी देणे.

खताची मात्रा : युरिया – १७५ किलो
: डी.ए.पी – ५० किलो प्रथम वर्ष/एकर
: एम.ओ.पी-२०० किलो

: युरिया – ३५० किलो
: डी.ए.पी –१०० किलो दुसरेवर्ष/एकर
: एम.ओ.पी-४०० किलो

: युरिया – ७००किलो
: डी.ए.पी –२०० किलो तिसरे वर्ष/एकर
: एम.ओ.पी-८०० किलो

वरील सर्व खते १० टप्प्यात देणे

- भांगलन व माती भर

- रोपांपासून ३० ते ४५ से.मी अंतरावर वर्षातून दोनदा भांगलन करून १० ते १५ से.मी खोल माती ढिली करणे व मातीचा भर रोपांना देणे
- फांद्या छाटणी
- पहिले २ वर्ष जमिनी पासून १ मी उंची पर्यंतच्या फांद्या मार्च ते में फांद्या छाटणी

# गाडेजळगाव १९९५ रोपवन (वनक्षेत्र) मानवेल बांबू





# बांबूसा बाल्कोवा रोपवन




